# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

barti

२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०

● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६


**परिपत्रक:**

**जा.क्र.बार्टी/वैधता प्रमाणपत्र/२०१८-१९/ ४०४९** **दिनांक — १९ जुन, २०१८.**

प्रति,

अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)

उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)

संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)

**विषय- वैद्यकीय/ अभियांत्रिकी/ उच्च शिक्षण/ कृषि/ दुग्ध व्यवसाय/ मच्छ व्यवसाय पदवीका/ पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी जात वैधता प्रमाणपत्र प्रवेशाच्या वेळी अनिवार्य असलेबाबत.**

**संदर्भ- मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई क्र. राज्य ससीईटी कक्ष/ प्रवेश प्रक्रिया/ २०१८-१९/ जात वैधता प्रमाणपत्र/ ७४५/ २०१८, दिनांक ०८-०६-१८**

मा. उच्च न्यायालय यांनी विशेष अनुमती याचिका क्र. २०१२१०-२०२२४/ २०१७ मधील सिव्हील अपिल क्र. ११२३४-४८ आणि ११२४९-५१/ २०१७ मध्ये दिलेले निर्देश आणि A.R.A. (Admission Regulating Authority) यांची नोटीस दिनांक १६-०६-२०१८ अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या मागास वर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश अर्ज भरतांना जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य केलेले आहे. त्या अनुरोधाने त्यांनी खालील अभ्यासक्रमासाठी वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. याबाबत सविस्तर सूचना http://www.dtemaharashtra.gov.in या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली आहे. अधिक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वरील वेबसाईटची मदत घ्यावी. याअनुरोधाने आपणास खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. शैक्षणिक प्रकरणामध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ स्विकारुन त्याची पावती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
२. विद्यार्थ्यांना ऑनलाईन (online) अर्ज भरण्यास अडचणी आल्यास ऑफलाईन (offline) अर्ज स्विकारण्यात यावेत व तशी नोंद घेण्यात यावी.
३. परीपूर्ण अर्ज तात्काळ निकाली काढावेत.

४. दिनांक १५ मे, २०१८ ते १५ जून, २०१८ पर्यंत राबविण्यात येत असलेली **"विशेष निपटारा मोहिम"** ही विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दिनांक ०२ जुलै, २०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तेंव्हा या कालावधीत येणाऱ्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालय चालू ठेवावे.

५. विशेष निपटारा मोहिमेच्या कालावधीत दैनंदिन निपटारा केलेल्या प्रकरणाची सांख्यिकी माहिती cvc@barti.in या ई-मेलवर पाठवावी.

६. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केलेले आहेत, परंतु त्यांचेकडे वैधता प्रमाणपत्र नाही, अशा विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय यादी दररोज आपणास सीईटी विभागामार्फत पाठविण्यात येईल, त्या याद्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे, व त्यांची प्रकरणे नियमानुसार वेळेत निकाली काढण्याबाबत उपाययोजना करावी.

आपणास कांही अडचणी उद्भवल्यास वा शंका असल्यास खालील अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

| अ.क्र. | विभाग | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण | श्री. एस.डी.उपरवट | सिस्टीम ॲनालिसीस | ९८९२२ ८८६७२ |
| २ | उच्च शिक्षण | डॉ. जी.टी.केदार | सहा. परीक्षा समन्वयक | ७६६६५ १९८३० |
| ३ | वैद्यकीय शिक्षण | डॉ. रायकर | परीक्षा समन्वयक | ९३२३८ ०७४६० |
| ४ | कृषि विभाग | डॉ. शार्दूल गांगण | परीक्षा समन्वयक | ७०२१० ८८०१४ |
| ५ | दुग्ध व मच्छ व्यवसाय विकास | श्री. मिलींद गिरकर | परीक्षा समन्वयक | ९४२०७ ७२९२२ |

**(कैलास कणसे) (भापोसे)**
**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे तथा मुख्य समन्वयक, जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२. श्री. ए. ई. रायते, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ (ई-मेल Maharashtra.cetcell@gmail.com

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना-**

श्री. प्रशांत बुध्दीवंत, प्रकल्प संचालक, बार्टी, पुणे यांना देवून कळविण्यांत येते की, सदरचे परीपत्रक https://www.barti.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करावे.